# नियमित दिवाणी दावा क्रमांक ०८/२०१५ मधील निशाणी क्र.१४३ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज, वादी यांनी प्रतिवादी क्र. ९ चे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दिला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र.९ आनंदराव महादेव गायकवाड हे दावा चालू असताना दिनांक २८.०३.२०२२ रोजी मयत झाले आहेत. ते मयत झाले त्यावेळी त्यांना अर्जामध्ये नमूद असणारे व्यक्ती हे हिंदू वारसा कायद्याप्रमाणे कायदेशीर वारस आहेत.सबब, प्रतिवादी क्र. ९ चे नावास कंस करुन अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे वारसांची नावे नमूद करण्याची व तशी दुरुस्ती करण्याची वादीस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

२. प्रस्तुतचे अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे देऊन हरकत नोंदविली. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, सदरील प्रतिवादीने आपले म्हणणे व कैफियत दिलेली नाही. पुरावेअंती अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास वादीला कॉस्ट करण्यात यावी.

३. प्रतिपक्षांच्या कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी मागणी केल्यानुसार वादी क्र. ९ चे वारस दाव्यात दुरुस्तीने अभिलेखावर घेण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मी मां सा

४. वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीने दावा जाहीर ठरावासाठी, वाटपासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ९ आनंदराव महादेव गायकवाड हे दावा चालू असताना दिनांक २८.०३.२०२२ रोजी मयत झाले आहेत. ते मयत झाले त्यावेळी त्यांना हिंदू वारसा कायद्याप्रमाणे अर्जामध्ये नमूदच कायदेशीर वारस होते व आहेत. प्रतिवादी क्र. ९ चे वारसांना त्यांचे पश्चात दावा चालविण्याचा हक्क असल्याने दावा गुणदोषावर चालणेसाठी प्रतिवादी क्र. ९ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही अगर दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. सबब मुद्दा नं.१ होकारार्थी देऊन मुद्दा नं.२ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.९ चे वारस सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ९अ ते ९क म्हणून अभिलेखावर घेण्यात येत आहे. सदर दुरुस्ती ही आजपासून १४ दिवसाचे आत करावयाची आहे.

३. वादीने योग्य त्या दुरुस्तीसह दाव्याची प्रत मुदतीत दाखल करावी.

VAIBHAV BAJRANG GHADAGE Digitally signed by VAIBHAV BAJRANG GHADAGE Date: 2025.09.03 18:07:57 +0530

( व्ही. बी. घाडगे )

दिनांकः- ०२.०९.२०२५ दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज.